Impact Factor-7.675 (SJIF)
ISSUE No- (CCCXVIII ) 318 ( D)

ISSN-2278-9308
September-2021

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Editor
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318

# Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar

Chief Editor
**Prof. Virag.S.Gawande**
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Editor
**Dr. Pramod S. Meshram**
I/c Principal,
Shri M. H. K. College of Arts & Comm. Pachal

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) D
ISSN : 2278-9308
September, 2021


| | | |
|---|---|---|
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक चळवळी<br>डॉ.शिवाजी सोमला पवार | 73 |
| 18 | माणगाव परिषद : स्वरूप व परिणाम प्रा.डॉ. श्रीराम यशवंत गडकर | 85 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य<br>श्वेता वैजनाथ आदोडे | 95 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महिला आत्मसन्मानविषयक विचारांची प्रासंगिकता<br>प्रा.डॉ. सिद्धार्थ मुंगे | 99 |
| 21 | स्त्रीमुक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. स्निग्धा कांबळे | 104 |
| 22 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीसंबंधी विचार<br>डॉ.श्रीप्रभू जी. चापके /प्रा.डॉ.सौ.ज्योती हरनारायण लाहोटी<br>सुलभा गुलाबराव वानखेडे | 107 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबिल प्रा.डॉ. सुनंदा चरडे | 111 |
| 24 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविशयक विचार व कार्य<br>डॉ सुनिल ओगले | 114 |
| 25 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महिलांसंबंधी दृष्टिकोन व कार्य<br>प्रा.सौ.कांबळे सुनिता शंकरराव | 118 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रियांसंबधी दृष्टिकोन व कार्य<br>प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 123 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिव्यवस्थेचे अर्थशास्त्रविषयक विचार<br>सुशिला आसाराम शेजवळ | 128 |
| 28 | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिकदृष्टीकोन" प्रा. स्वप्नील चव्हाण | 132 |
| 29 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान<br>प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी | 136 |
| 30 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार<br>प्रा. विजय डी. वाकोडे | 139 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक कार्य<br>शिंगे विकास मलकारी | 143 |
| 32 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर और हिंदी साहित्य राजेंद्र वसंतराव जाधव | 148 |
| 33 | संस्कृती परिवर्तक बाबासाहेब प्रा.डॉ.राजेश चवरे | 153 |
| 34 | महिलांच्या विकासात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान प्रा. रवींद्र म. कांबळे | 160 |
| 35 | "डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व कार्य"<br>साधना सुखदेव जाधव | 164 |
| 36 | आदिवासी कवितेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव | 167 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) D
ISSN : 2278-9308
September, 2021

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक चळवळी

डॉ.शिवाजी सोमला पवार
संशोधन—मार्गदर्शक,इतिहास विभाग दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड
email: shivajipawar552@gmail.com, Mob: 9423656213,7588889488

प्रस्तावना :

डॉ.भीमराव रामजी आंबेडकरांचा जन्म महू (मध्य प्रदेश) नामक ग्रमी १४ एप्रिल १८९१ रोजी सामाजिक व धार्मिक दृष्टया बहिस्कृत असलेल्या महार जातीत झाला. समाजसुधारणेची व दलितोन्नतीची प्रेरणा भीमरावांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली.त्याचे मूळ गाव रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालूक्यातील आंबवडे हे होते. रत्नागिरी जिल्हयातील दापोली येथे प्राथमिक व सातारच्या सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. डॉ.भीमराव आंबेडकरांचे मूळ आडनाव सकपाळ होते. त्यांचे मूळ गाव आंबवडे असल्यामुळे सकपाळ हे नाव मागे पडून त्यांचे आडनाव आंबवडेकर झाले.सातारा येथील शाळेत शिक्षण घेत असतांना तेथील ब्राम्हण शिक्षक आंबेडकर यांनी भीमरावांचे आडनाव आंबेडकर असे केले.डॉ.बाबासाहेबांना अनेक अवमानकारक प्रसंगांना या शैक्षणिक कालखंडापासून तोंड द्यावे लागल्यामुळे जन्मनिष्ठा विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेबध्दल चीड त्यांच्या मनात निर्माण झाली.त्यांनी आपले आयुष्य दलितांच्या उध्दारासाठी खर्च केले.ते ख—या अर्थाने दलितांचे उध्दारक ठरतात.त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना जनतेने बाबासाहेब ही पदवी बहाल केली.डॉ.आंबेडकर जन्माला आले त्या काळात देशातील समाजात अस्पृश्यता, जातीयता, विषमता, उच्च.निच, अंधश्रध्दा यासारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या.समाजात असलेल्या अनेक जातीपैकी महार, मांग व चांभार हया जाती अस्पृश्य म्हणून गणलेल्या होत्या.त्यांच्यास्पर्शामुळे उच्चवर्णीय लोकांना विटाळ होतो अशी पक्की समजूत रूढ असल्याने उच्चवर्णीय लोक अस्पृश्यतेच्या नावाखाली दलितांच्या अत्यंत अपमानास्पद वागणूक देत असत.सार्वजनिक आड, विहिर, बारव,पाणवठे,नदी,तलावातील पाणी घेण्याचाअधिकार दलितांना नव्हता.सामाजिकदृष्टया ते बहिस्कृत होते.त्यांच्या स्पर्शाने विटाळ होउ नये म्हणून त्यांची वस्ती गावकुसाच्या बाहेर ठेवलेली असे.न्हावी लोक जनावरांचे केस कापत असत.परंतु ते दलितांचे केस कापत नसत. स्वत:डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केले होते. त्यामुळेच त्यांनी समाजपरिवर्तन आली दलितांच्या उध्दारासाठी आयुष्यभर सामाजिक लढा दिला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले.सयाजीराव गायकवांडाच्या आग्रहाने त्यांनी संस्थानी सेवा पत्कारली.तरी ऑफिसात व ऑफिसाबाहेरही सन्मानाची वागणूक त्यांना मिळत नव्हती.महाराजांनी डॉ.बाबासाहेबांना अमेरिकेत धाडले.तेथे कोलबिया विदयापीठात त्यांनी अध्ययन केले.एम.ए.ची पदवी मिळवून नंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत ते प्रविष्ट झाले. परंतु तेथील अभ्यासक्रम पूर्ण न करताच त्यांनी मायदेशी परतावे लागले.परदेशी उच्च शिक्षणाने अलंकृत होऊन बडोदयाच्या महाराजांचे लष्करी सचिव म्हणून ते रूजू झाले. तरी सामाजिक प्रतिष्ठा, समतेची वागणूक व सहदयता त्यांच्या वाटयाला येऊ शकली नाही. इ.स.१९१७ अखेर त्यांनी बडोदेला सोडले. इ.स. १९१८ साली मुंबईच्या एका महाविदयालयात अर्थशास्त्राचे अध्यापन त्यांनी सुरू केले.इ.स.१९२० च्या सप्टेंबर महिण्यात राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ते लंडनला रवाना झाले. वर्षभरात त्यांनी"प्रॉव्हिन्शियल डिसेंद्रलायझेशन ऑफ इम्पीरियल फायनान्स ऑफ ब्रिटिश इंडिया" चा विषयावरील आपला शोधप्रबंध लंडन विदयापीठाकडे सादर केला . त्यांना त्यावर एम.एस्सी. (इकॉनॉमिक्स)ही पदवी प्राप्त झाली.पुढे त्याच विद्यापीठाने बाबासाहेबांना त्यांच्या दि प्रॉब्लेम ऑफ

दि रूपी: इटस ओरिजिन अँड इटस सोल्यूशन" या विषयावरील प्रबंधासाठी डी.एस्सी. (इकॉनॉमिक्स) ही सर्वश्रेष्ठ पदवी प्रदान केली.हे शैक्षणिक यश संपादित असतांनाच आंबेडकरांनी आपल्या अवतारकार्याचीही पायाभरणी चालविली होती. अस्पृश्य समाजाचा उध्दार हे ते कार्य होते. मॉटफर्ड सुधारणांची जुळवाजुळव चालू असतांना तदर्थ नेमण्यात आलेल्या साउथबरो आयोगासमोर साक्ष देऊन त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती."मुकनायक" "बहिस्कृत भारत" अशी साप्ताहिके चालवून या पददलितांच्या दुःखांना त्यांनी वाचा फोडली होती."बहिस्कृत हितकरणी सभा" काढून तिच्या मार्फत अस्पृश्यांना शिक्षणाचा प्रसार करणे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांना न्याय मिळवून देणे, अशी कार्ये त्यांनी सुरू केली.अस्पृश्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात विधिमंडळ व सरकारी नोकऱ्यांत जागा मिळवून देणे, त्यांना सर्व सार्वजनिक ठिकाणांवर मुक्तप्रवेश मिळवून देणे अशी या प्रयत्नांची उदिदष्टे होती.२५ डिसेंबरला १९२७ रोजी आंबेडकरांनी "अस्पृश्यांच्या गुलामगिरीची सनद" असलेल्या मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. नाशिकच्या काळाराम मंदिरात .१९३० साली सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी प्रवेश मागितला. या दोन्ही प्रसंगांना बाबासाहेबांच्या मते प्रतीकात्मक महत्व होते. रॉयल कमिशन, ऑन करन्सी अँड फायनान्स, सायमन कमिशन, गोलमेज परिषदा १९३२ च्या "जातीय निवाडया" हे "पुणे करार" या नावाने ओळखला जातो.

**दलितांचे प्रबोधन आणि संघटन :**

समाजिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून बहिष्कृत,आर्थिकदृष्टया उपेक्षित व शोषित आणि पीडित असलेल्या जातींचा समावेश दलित या संज्ञेत केला जातो. या दलित जातीत महार, मांग, आणि चांभार या जातीचा समावेश होतो. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा, परंतु या गरजापासून दलित उपेक्षित होते.समाजात दलितांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.त्यांना शिक्षणापेक्षा रोजच्या रोजीरोटीची काळजी होती. हा समाज उच्चवर्णीय हिंदूच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक, शैक्षणिक गुलामगिरीत तो जीवन जगत असत. अशा वेळी डॉ.बाबासाहेबांनी त्यांच्या स्थितीत परिवर्तन घवून आणण्यासाठी त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणे, आत्मविश्वास जागृत करणे, त्यांना संघटित करून न्यायासाठी संघर्ष करण्यासाठी तयार करणे हे महत्वांचे होते.[१] त्यामुळे एकीकडे समाजमानसाला हादरे देऊनते जागे करीत असतांनाच दुसरीकडे सरकारी यंत्रणेलाही वस्तुस्थितीची जाणीव करून देण्याचे प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी अव्याहतपणे चालू ठवले होते. यासाठी प्रथम दलितांचे समाजप्रबोधन आणि संघटन करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.त्यासाठी सामाजिक चळवळी व समाजप्रबोधनपर भाषणे दिली.[२]

**मानगाव परिषद–१९२० :**

२० आणि २१ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन म्हणजेच ऐतिहासिक मानगाव परिषद होय . या परिषदेला पाच हजार लोकांचा समुदाय होता.या परिषदेचे संयोजक मानगावचे तत्कालीन गावचे गावकामगार पाटील अप्पासाहेब दादगोंडा पाटील होते. तर परिषदेच्या आयोजनासाठी कोल्हापूरातील अस्पृश्यांचे पुढारी डॉ.रमाकांत कांबळे व निगाप्पा ऐदाळे यांनी प्रयत्न केले. या परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. तर प्रमुख पाहूणे कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज होते. २१ मार्च १९२० रोजी मानगाव परिषदेची सुरूवात दुपारी पाच वाजता झाली. मानगाव परिषद ही बाबासाहेबांच्या जीवनातील पहिलाच मोठा व जाहीर सार्वजनिक कार्यक्रम होता. या परिषदेमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व उदयास आले.[३] आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले ही परिषद अनेक दृष्टीनी अपूर्व आहे. ज्या हिंदू धर्माचे आपण घटक आहोत त्या हिंदू धर्माच्या व्यवहारात मनुष्यमात्राने संघटन दोन आदितत्वांना धरून झालेले दृष्टीस पडते. जन्म योगायोग आणि जन्मसिध्द पवित्राता या दोन

तत्वानुरूप विभागणी केली तर त्याचे तीन वर्ग होतात.१) जन्माने सर्वात श्रेष्ठ व पवित्र ज्याला आपण ब्राम्हाण वर्ग असे म्हणतो.२) ज्यांची जन्मसिध्द श्रेष्ठता व पवित्रता ब्राम्हणपेक्षा कमी दर्जाची आहे असा जो वर्ग तो ब्राम्हणेत्तर वर्ग ३) जे जन्मसिध्द कनिष्ठ व अपवित्र अशांचा जो वर्ग तो आपला बहिस्कृत वर्ग होय.[४] आपल्या बहिस्कृत वर्गाची स्थिती मात्रा जन्मसिध्द अयोग्यतेमुळे व अपवित्रतेमुळे फारच शोचनीय झाली आहे. सामाजिक दृष्टया हिंदूधर्मीयांप्रमाणे त्यांना हक्क नाहीत. त्यांना शाळेत जाता येत नाही. जन्मसिध्द अयोग्यतेमुळे व अपवित्रतेमुळे आर्थिकदृष्टया त्यांचे तितकेच नुकसान झाले आहे. व्यापार, नौकरी व शेती हे जे धनसंचयाचे तीन मार्ग आहेत. ते त्यांना खुले नाहीत. विटाळामुळे व्यापार, शिवाशिवी मुळे नोकरी मिळत नाही, तशीच शेतीच्या बाबतीत दशा आहे. म्हणून बहिस्कृत वर्गात नैसर्गिक गुणांची वाण नाही, हे सर्वास मान्य आहे, परंतु त्यांचा विकास होत नाही त्यांचे मुळे कारण त्यांना परिस्थिती सानुकुल नाही. या करिता आपण राजकीय सामर्थ्य संपादिले पाहिजे व जातवार प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती राजकीय सामर्थ्य येणार नाही. सत्याचा जय होण्यास आपण आपली चळवळ कायम ठेवली पाहिजे.[५]

**बहिस्कृत हितकारिणी सभा—१९२४ :**

१९२० ते १९२३ या काळात "मूकनायक" या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यासाठी संघटित होण्याची गरज स्पष्ट करण्यासाठी जनजागृती करण्याचे कामा बाबासाहेब आंबेडकरांनी आरंभिले होते. अस्पृश्यांच्या सर्वांगीण चळवळीचा धूरा वाहू शकेल अशी संस्था उभारून, त्याद्वारे कार्य करावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथील दामोदर हॉल, परळ येथे २० जुलै १९२४ रोजी "बहिस्कृत हितकारणी सभा" या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून बहिस्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, बहिस्कृत समाजात उच्च संस्कृतीची वाढ करण्यासाठी वाचनालये, शैक्षणिक वर्ग व स्वाध्याय संघ स्थापन करणे, बहिस्कृत समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्यगिक व शेतकीविषयक शाळा चालविणे. बहिस्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी विद्यार्थी वसतीगृह काढणे, विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देणे, बहिस्कृत वर्गाची माहिती गोळा करून ती लोकनिदर्शनास आणून लोकमत तयार करणे, संरकारकडूनत्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व सवलती मिळाव्यात म्हणून प्रयत्न करणे, समाजजागृती साठी कीर्तन अथवा व्याख्याने यांची सोय करणे, अशी उद्देश या संस्थेने समोर ठेवले होते.[६]

या संस्थेस स्पृश्य लोकांनीही सहकार्य करावे असे नमूद करून बहिस्कृत वर्गाचा प्रश्न हा संपूर्ण समाजाचा प्रश्न आहे, त्यांच्याकडे लक्ष दिले नाही तर देश पंगू होईल, खितपत पडलेला बहिस्कृत समाज काही थोडा नाही. अखिल हिंदूस्थानातील लोकसंख्येचा तो सहावा भाग आहे एवढा मोठा हीन—दीन होऊन पंगूवत पडला आहे. तो पर्यंत हा देश असाच हीनदीन स्थितीत राहणार यात शंकाच नाही. या सभेचे कार्य खेडयापाडयात पोहोचले होते. १० एप्रिल १९२५ रोजी मुंबई इलाखा प्रांतिक बहिस्कृत परिषद निपाणी, जि.बेळगाण येथे भरली होती. अध्यक्षपदावरूनडॉ. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणांसाठी तयार व्हा! टसा संदेश दिला.तसेच "आम्ही आपले मानव जातीस प्राप्त असलेले समान हक्क मागत आहोत" अशी भूमिका घेऊनबहिस्कृतांचा लढा हा जागतिक मानवाच्या मुक्तीच्या लढयाचा, एक भाग आहे. या बहिस्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" असे होते. या सभेच्यावतीने "बहिस्कृत भारत" हे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केले. या पाक्षिकांचे संपादक स्वत: डॉ.बाबासाहेब होते. "आजकालचे प्रश्न" या सदरात त्यांनी बहिस्कृतांच्या संदर्भात अनेक लेख लिहून चळवळीची

ISSN : 2278-9308
September, 2021

भूमिका स्पष्ट केली आहे. अग्रलेखातून त्यांनी धर्म, रूढी, परंपरा, अस्पृश्ता या संबंधी शास्त्रीय भूमिका घेऊन मते व्यक्त केली आहेत.[७]

समता सैनिक दल—१९२७:

स्माजात अनिष्ट व घातक प्रथा अस्तित्वात होत्या. समाजात विषमता निर्माण झाली होती. याच काळात डॉ.आंबेडकरांच्या चळवळीमुळे समाजात जागृती निर्माण झाली होती. त्यामुळे हजारो वर्षे मान खाली घालून जीवन जगणारे लोक ताठ मानेने जीवन जगत होते. आणि हे स्पश्य लोकांना आवडत नव्हते. याचाच परिणाम म्हणून गावागावातील स्पश्यांकडून पैसे घेऊन गुंड अस्पृथ्यांवर अन्याय—अत्याचार करीत होते. अशावेळी गावागावातील लोकांच्या संरक्षणासाठी, चळवळीची ताकत वाढविण्यासाठी आणि महाडच्या सत्यागृहाच्या यशस्वीतेसाठी समता सैनिक दलाची महाड येथे डॉ.बाबासाहेबड आंबेडकर यांनी १९ मार्च १९२७ रोजी स्थापना केली. ज्या धार्मवर विषमतेचा कीट चढला आहे तो धर्म झुगारून देऊन खरी माणुसकी जाणणारा धर्म निर्माण करण्याकरिता जे कार्य करावे लागत आहे. त्या पवित्र आणि उज्जवल कार्यासाठी या दलाची स्थापना झालेली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "दुसरे असे की, या शहरात पुष्कळ गुंड व बदमाश लोक दबा धरून आहेत. त्यांच्यापासून संरक्षण करण्याकरिता तुम्ही चाळीचाळीतून प्रत्येक मोहोल्यातून संरक्षक दले तयार करा आणि संघटनेने राहा." तसेच समता सैनिक दलाचे उद्देश, दलाचा सैनिक कसा असावा, समता सैनिक दलाचा गौरव, समता सैनिक दलाच्या कार्याचे स्वरूप, समता सैनिक दलाची विचारसंहिता, समता सैनिक दलाची आचारसंहिता, समता सैनिक दलाची जबाबदारी, समता सैनिक दलाची घटना, सैनिकांची प्रतिज्ञा, समता सैनिक दलाचा उद्देश, शिक्षण, संघटना, दलाची सभा, दलाची नेहमीची कामे, शिस्त, युनिफॉर्म, फंड, ध्वज, अशा विविध बाबीचा समोवश करण्यात आले होते[८].

महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह :

मुंबई कायदेमंडळात ब्राम्हणेत्तर पक्षाचे नेते सी.के.बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी सार्वजनिक ठिकाणांचा अस्पृश्यांना उपभोग घेऊ द्यावा असा ठराव मांडला व तो मंजूर करण्यात आला. या ठरावांची अमलबजावणी व्हावी असा हुकुम सरकारने ११ सप्टेंबर १९२३ रोजी काढला. या ठरावांची अमलबजावणी व्हावी अशी मागणी अस्पृश्यांच्या सभाव बैठकांतून केली जाऊ लागली. त्या ठरावानुसार सार्वजनिक पाणवटयावर अस्पृशंना पाणी भरण्याचा हक्क मिळाला. महाड नगरपालिकेने आपल्या अधिकाराखली असलेले चवदार तळे त्या ठरावानुसार अस्पृश्यांना खुले केल्याचे जाहीर केले होते. परंतु स्पृश्य हिंदूच्या भीतीमुळे तेथील अस्पृश्यांनी त्या तलावाचे पाणी भरण्याचा हक्क बजावला नव्हता. डॉ.बाबासाहेबांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिस्कार परिषद घेतली.बाबासाहेब म्हणतात "मित्र हो, आपण माणसारखी माणसे आहोत, तरी आपणास जनावरांचे जिणे कंठावे लागत आहे, ही मोठी नामुस्कीची गोष्ट आहे. तुम्ही हाडामासाचे हिंदू आहात, तरी तुम्हास पाणवटयावर पाणी मिळत नाही. देवळात जाऊन देवाचे दर्शन घेता येत नाही किंवा सार्वजनिक ठिकाणी दिमाखाने बसता येत नाही. हा अन्याय सहन करता कामा नये. तुम्ही स्वत:च आपल्या पायावर उभे राहून आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे. त्यासाठी तुमची पिढी खलास झाली तरी बेहत्तर[९]." त्यानुसार १९ मार्च १९२७ रोजीच म्हणजे एक दिवस अगोदरच महाडला पोहचले, सुमारे २० हजारांचा प्रचंड जनसमुदाय महाडला जमला.२० मार्च १९२७ रोजी परिषद सुरू झाली. बाबासाहेब आंबेडकर परिषदेचे अध्यक्ष होते. प्रचंड जनसमुदयापुढे अनेक स्पृश्य अस्पृश्य नेत्यांची स्फुर्तिदायक भाषणे झाली. अस्पृश्यांच्या समान हक्काचा सर्वांनी घोषणा केली. मोर्चा चवदार तळयाकडे वळविला. बाबासाहेबांनी तळयातील पाणी ओंजळीने पिले. ही घटना स्पृश्यांना सहन झाली नाही. त्यांनी दलितावर लाठया.काठयांनी हल्ले व महारांनी तळे

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) D
ISSN : 2278-9308
September, 2021

बाटविले म्हणून त्यात गोमुत्र टाकून त्याचे शुध्दीकरण केले. परंतु नगरपालिके हा ठराव रद्द केल्यामुळे डॉ.बाबासाहेबांनी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे सत्यागृह परिषद घेण्याचे ठरविले. ही परिषद समतेची मुहूतमेठ रोवण्यासाठी आयोजित केली होती. थोडक्यात पाण्यासाठी महाड येथे बाबासाहेबांनी केलेला सत्यागृह हा जगाच्या इतिहासातील पहिला सत्यागृह ठरतो[१०]

**मनुस्मृतीचे दहन : (२५ डिसेंबर १९२७)**

"मनुस्मृती"या हिंदू धर्मग्रंथाने जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेचे समर्थन करून पर्यायाने सामाजिक विषमतेला व त्यावर आधारित जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला होता. तेव्हा सामाजिक विषमता व उच्चनीच भेदभाव यांचे समर्थन करणा—या या ग्रंथाचा प्रतीकात्मक निषेध करण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी महाड येथे भरलेल्या परिषदेत लोकविग्रही व माणुसकीचा उच्छेद करणा—या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला आणि परिषदेच्या खास मंडपात तयार करण्यात आलेल्या वेदीत मनुस्मृती ठेवण्यात आली आणि काही अस्पृश्य साधूंच्या हस्ते विधिपूर्वक दि. २५ डिसें १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले[११]. धार्मिक ग्रंथावर झालेला हा असा भयंकर हल्ला आधुनिक भारतात पहिला नसला, तरी अपूर्वच म्हटला पाहिजे. सर्व माणसे जन्मत: समान दर्जाची आहेत मरेपर्यंत समान दर्जाची राहतील विषमतामूलक समाजरचनेचा पुरस्कार करणा—या प्राचीन नि आर्वाचीन ग्रंथाचा तीव्र निषेध करण्यात आला.श्रुती, स्मृती नि पुराण वगैरे हयांचे प्रामाण्य कबूल करण्यास ही परिषद तयार नाही. रस्ते, पाणवठे, देवालये वगैरे ठिकाणी कोणासही प्रतिबंध नसावा, हा ठराव सीतारामपंत शिवतरकर यांनी माडला. भाऊराव गायकवाड, एन.टी.जाधव व गंगूबाई सावंत यांनी त्यावर जळजळीत भाषणे केली. दुस—या ठरावाने शुद्र जातीचा उपमर्द करणारी, त्यांची प्रगंती खुंटविणारी, त्यांचे आत्मबळ नष्ट करणारी, त्यांची सामाजिक, आर्थिक , राजकीय गुलामगिरी कायम ठेवणारी मनुस्मृती हिचाही परिषद दहनविधी करीत आहे. मनुस्मृतीचे दहन करावे असा ठराव झाल्यावर रात्री ९ वाजता परिषदेच्या समोर एक खडयात अस्पृश्य बैराग्याच्या हस्ते मनुस्मृतीची होळी करण्यात आली. अशा रीतीने अस्पृश्य समाजाच्या परिषदेने स्पृथ्य हिंदूच्या अत्यंत पूज्य अशा ग्रंथाचा प्रक्षोभकरीच्या धिक्कार केला. विषमता, निर्दयता नि अन्याय यांच्या त्या प्रतीकाला मूठमाती दिली.[१२]

**मंदिर प्रवेशासाठी सत्यागृह :**

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयनी अनुसूचित जातींना मंदिरप्रवेशाचा हक्कही नाकारला होता. याबाबत आंबेडकरांनी अशा आशयाचे उदगार काढले होते की, हिंदुत्व ही जितकी सवर्णाची मालमत्ता आहे तितकीच ती मागासवर्गीयांची ही आहे.म्हणून मंदिरप्रवेशाचा आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे. हा हक्क सिध्द करण्यासाठी त्यांनी नाशिक येथे आपल्या हजारो अनुयायासमवेत ३ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिरप्रवेशासाठी सत्यागृह केला. त्यांना हे दाखवून द्यायवयाचे होते,की उच्चवर्णीयानी मागासवर्गीयांना वर्षानुर्षे त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले असले तरी यापुढे मागासवर्गीय बांधव हा अन्याय सहन करणार नाही. ते आपल्या न्याय हक्कांसाठी प्रसंगी संघर्षदेखील करतील, पण आपले हक्क मिळविल्याखरेज ते स्वस्थ बसणार नाहीत. डॉ.बाबासाहेब यांच्या अशा कृतीतूनच मागासवर्गीयांची अस्तिता जागी झाली.[१३]

**१) अंबदिवी मंदिर सत्यागृह :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जसा पाण्यांसाठी सत्यागृह करावा लागला त्याचप्रमाणे त्यांना मंदिर प्रवेशासाठीही सत्यागृह करावा लागला. दलितांना सार्वजनिक पाणवठयावर जसा प्रवेश नव्हता, त्याचप्रमाणे त्यांना सार्वजनिक हिंदू मंदिरातही प्रवेश करण्यास मनाई होती. दलितांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मूर्तीही अपवित्र होत नाही. हे ही सिध्द करण्याचा हेतू हा चळवळीमागे होता. अमरावती येथे अंबादेवीचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात प्रवेश

ISSN : 2278-9308
September, 2021

मिळवण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या नेतृत्वाखाली, तसेच गोविंदराव मेश्राम आणि संपतराव नाईक यांच्या पुढाकाराने तर २६ जुलै १९२७ रोजी दादासाहेब बागवे यांच्या निवास्थानी, दादासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन विनंती अर्ज करण्यात आला. डॉ.बाबासाहेब प्रत्यक्ष उपस्थित राहून सत्यागृहीना मार्गदर्शन केले.शेवटी २८ सप्टेंबर १९३२ रोजी मंदिरांच्या पंच कमिटीने अंबदिवीचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले[१४].

२) पर्वती मंदिर सत्यागृह :

पुणे येथील पर्वती टेकडीवरील मंदिर अस्पृश्यांना खुले नव्हते. मंदिर खुले करावे म्हणून एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, रा.के.खाडीलकर व शिरूभाऊ लिमये यांनी मंदिरांच्या ट्रस्टला अर्ज केला. मंदिर खाजगी असल्याचा दावा करून अर्ज फेटाळला. तेंव्हा शिवराम जानबा कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटीने सत्यागृह करण्याचे ठरवले तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पंचकमिटीचे सदस्य व अस्पृश्यता निवारण मंडळाचे सदस्य ढोंगी असल्याची टीका केले. त्यामुळे १३ ऑक्टोबर १९२९ पुणे पर्वती मंदिर सत्यागृह सुरू झाला.यात राजभोज व स्वामी योगानंद यांच्यासहित २५० स्त्री, पुरूषांनी सत्यागृहात भाग घेतला. सत्याग्रहीवर स्पृश्यांनी शिव्या व दगडांचा वर्षाव केला[१५].

काळाराम मंदिर सत्यागृह १९३०:

डॉ.बाबासाहेबांनी दक्षिणेतील काशी म्हणून ओळखले जाणारे नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्यागृह समिती स्थापन केली.नाशिक मंदिर प्रवेश सत्यागृहाचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब यांनी केले. मंदिर पुजा—यांच्या ताब्यात आहे आणि मंदिर सार्वजनिक नाही अशी भूमिका घेतली गेली. इ.स.३ मार्च १९३० रोजी आठ ते दहा हजार अस्पृश्य सत्यागृही नाशिक शहरात प्रवेश करून मिरवणूक काढून मंदिराजवळ प्रवेशासाठी प्रवेशद्वाराजवळ आले. जिल्हाधिका—यांच्या आदेशानुसार मंदिरांचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले. देवालयाच्या चार दरवाज्याजवळ या सत्यागृहीनी धरणे धरली. देवालयाची दारे मात्र सतत बंद होती[१६].७ एप्रिलला २०० सत्यागृहीसह बाबासाहेब मिरवणुकीने मंदिराकडे गेले. परंतु ९ एप्रिलला सनातनी मंडळीनी रथ व विमान ओढत नेण्यास नियोजित वेळेपूर्वीच प्रारंभ केला. यामध्ये अनेक सत्यागृही जखमी झाले होते. १५ एप्रिल १९३२ ला रामनवमी होती. या दिवशी देवराव नाईकांच्या नेतृत्वाखाली महार स्त्रियांनी मंदिरात प्रवेशकरण्यात प्रयत्न केला. त्या सर्व स्त्रियांना व भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, सावळाराम दाने व हारिभाऊ जाधव यांना अटक केली व त्यांना शिक्षाही झाल्या. २४ मार्च १९३४ ला पुन्हा सत्यागृह करण्याचा विचार होता परंतु सत्यागृह न करण्याचा सल्ला बाबासाहेबांनी दिला १९३६ नंतर मंदिराचे दरवाजे उघडले नाशिकच्या या सत्यागृहामुळे दलितांत हक्कांची जाणीव निर्माण झाली. तसेच दलित चळवळीची प्रगती झाली[१७].

डॉ.आंबेडकर आणि पुणे करार — १९३२ :

समाजिक समतेच्या आंदोलनाबरोबरच देशाच्या राजकारणात भाग घेणे अपरिहार्य आहे असे डॉ.बाबासाहेबांना वाटू लागले. कारण सत्ता असल्याशिवाय धोरणे राबविता येत नाहीत हे त्यांना माहित होते महाडच्या सत्यागृहाने, मनुस्मृतीच्या दहनाने, काळाराम मंदिर प्रवेश सत्यागृहाने आणि एकंदर सभा, परिषदा यांच्यामुळे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजात अभूतपूर्व अशी जागृती आणि संघटना निर्माण झाली. म्हणून नागपूर येथे अखिल भारतीय बहिस्कृत वर्गाची परिषद घेण्याचे ठरले. परंतु सांप्रदायिक प्रश्नावर भारतीय प्रतिनिधीत एकमत न झाल्यामुळे या प्रश्नांत ब्रिटिश सरकारला हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली [१८].ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १९३२ रोजी सांप्रदायिक प्रश्नांच्या संदर्भात आपला, निर्णय जाहीर केला. तो मॅकडोनाल्डचा निर्णय किंवा जातीय निवाडा या नावाने इतिहासात प्रसिध्द आहे. या निर्णयानुसार मुसलमान, हरिजन, शीख,

ख्रिश्चन, युरोपियन व अग्लो इंडियन या सर्वांना अल्पसंख्याक समजून त्यांना स्वतंत्रय मतदानसंघ देण्याची घोषणा केली. १८ ऑगस्ट १९३२ रोजी गांधीजीनी रॅम्से मॅकडोनाल्ड यांना पत्र पाठवून कळविले की, हरिजनासाठी सरकारने जाहीर केलेला स्वतंत्र मतदानसंघाचा निर्णय रद्द न केल्यास मी आमरण उपोषण करीन[१९].त्यानुसार त्यांनी २० सप्टेंबर १९३२ रोजी येरवडयाच्या कारागृहात आमरण उपोषण केले.अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ नाकारावा असा आग्रह महात्मा गांधीजीनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे धरले. परंतु बाबासाहेब आणि महात्मा गांधीजी आपापल्या भूमिकेवर ठाम होतो. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.जयकर, घनश्याम बिर्ला, चुन्नीवाल मेहता आणि राजगोपालाचारी यांच्यासमेत २१ सप्टेंबर १९३२ रोजी गांधीजीची भेंट घेतली. या भेटीत बाबासाहेब व गांधीजीनी मुंबई योजनेस मान्यता दिली.[२०]दल

१) डॉ.बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग करावा व संयुक्त मतदारासंघाचा स्वीकार करावा.

२) केंद्रातून १८ टक्के जागा तर हरिजनासांठी १४८ जागा राखीव ठेवण्यात आल्या.

३) डॉ.बाबासाहेब आंबैडकरांनी हरिजन हा हिंदू समाजाचा अविभाज्य घटक असल्याचे मान्य केले.

४) महात्मा गांधीजीनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी प्रयत्न करण्याचे मान्य आहे.

पुणे करारावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रहितसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग करून करारावर सही केली[२१].

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महार वतन :**

गवचे वतनदार महार असून त्यांना महारकीचे वतन होते. वतनदारीच्या मोबदल्यात त्यांना सरकारकडून इनाम जमीन आणि रोख रक्कम तर गावाच्या लोकांनकडून वर्षाकाठी सुगीच्या दिवसात बलुते दिले जात असत. त्यांना सरकारची व लोकांची विविध प्रकारची कामे करावी लागत. महारकीच्या वतनामुळे महार गावचा हरकाम्या शिपाई आणि वेठबिगार बनला होता. वतनाच्या लोभाने तो सर्वस्वी परावलंबी झाले होते.१७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत महारांच्या वंशपरपरांगत हुदयासंबंधीच्या कायद्यात दुरूस्ती सूचविणारे विधेयक सादर केले होते[२२].

१) महारांच्या वतनी जमिनी सरकारने काढून घेतलेल्या त्या परत जिल्हाधिका—यानी मिळवून द्याव्यात.

२) वतनदार महारांचा पगार सरकारी तिजोरीतून द्यावा.

३) महारांना मिळणारे बलुते सरकारने जमीन महसुलसोबत शेतक—याकडून गोळा करावा.

४) वतनी महारांच्या सरकारी कामाची यादी निश्चित करावी.

५) महार वतनामुळे उच्चवर्णीयांचे गुलाम बनले होते म्हणून डॉ.बाबासाहेबानी महार वतन नष्ट करण्यासाठी १९२७ मध्ये चळवळ सुरू केली. ती शेवटी १९५८ मध्ये पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एक कायदा करून महाराष्ट्रातील महारांच्या वतनाचा शेवट केला[२३].

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सभा आणि परिषदा :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई इलाख्यात नाशिक जिल्हयातील येवला येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी दलित लोकांची सभा घेतली . या सभेत त्यांनी धर्मांतर करण्याची घोषणा केली. सभेत केलेल्या भावणात ते म्हणाले," मी हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही".याच सभेत त्यांनी धर्मांतराचा ठराव मांडला. धर्मांतराच्या घोषणेमुळे येवला येथील सभेला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले. वेठबिगारी, गावकीची व बलुतेदारीची कामे करणे बंद करून हिंदू लोकांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचाही संदेश बाबासाहेबांनी सभेत दलितांना दिला.३० मे ते १ जून १९३६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईच्या नायगाव भागात मुंबई इलाखा महार परिषद आयोजित केली. परिषदेच्या हैदराबाद संस्थानात प्रति आंबेडकर समजले

जाणारे बी.एस. व्यंकटराव होते. डॉ.बाबासाहेब त्यांना "दख्खनचे आंबेडकर" अशी पदवी दिली होती. अध्यक्षीय भाषणात बी.एस.व्यंकटराव म्हणाले, "दलितांनी हिंदूचे सण व उत्सव साजरे करू नयेत. तसेच हिंदूच्या तीर्थक्षेत्रात भेट देऊ नये, धर्मांतर म्हणजे पळवाट नाही किंवा आम्ही आमच्या हक्क व अधिकार यासाठी सुरू केलेला संघर्ष सोडून देत नाही[२४]."

३० डिसेंबर १९३८ रोजी डॉ.बाबासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व खानदेश जिल्हयातील चाळीसगाव तालुक्यातील मक्रणपूर, डांगरा येथे औरंगाबाद जिल्हा दलित परिषद संपन्न झाली. या परिषदेचे संयोजक भिकाजी काशीराम थोरात आणि भाऊसाहेब शिवराम मोरे होते, तर एस.व्ही. जाधव हे स्वागताध्यक्ष होते. मक्रणपूर हे गाव आज औरंगाबाद जिल्हयातील कन्नड नगरपालिकेच्या हद्दीत असून त्यास भीमपूरा म्हणतात. परिषदेच स्वागताध्यक्ष श्याराव भिकाजी जाधव यांनी केलेल्या प्रास्ताविक भाषणात संस्थानातील दलिताच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीवर प्रकाश टाकून त्यांनी निझाम सरकारच्या प्रशासनावर प्रखर टीका केली. दलितांना उद्देशून बाबासाहेब पुढे म्हणतात, "तुमच्यावर अनंत बंधने आहेत. तुम्हाला भाषण स्वातंत्र्य व मिरवणूक स्वातंत्र्य नाही,तेव्हा मी तुमची दु:खे नाहीशी करण्याच्या प्रयत्न करीन. येथील राज्य करण्याची पध्दत सदोष असल्यामुळे तुम्ही आतून काही करू शकत नाही पण मी बाहेरून जरूर करीन, या परिषदेत पास झालेले सर्व ठराव सर अकबर ईदरी यांच्याकडे पाठवीन,"

मक्रणपूर परिषदेनंतर २३ फेब्रुवारी १९४१ रोजी मोगलाई मराठवाडा आणि सोलापूर जिल्हयातील महार.मांग वतनदार परिषद सोलापूर जिल्हा बार्शी तालुक्यातील तडवळे (ढोकी) येथे झाली. ही शैक्षणिक परिषद होती. या परिषदेचे अध्यक्ष हे डॉ.बाबासाहेब होते. परिषदेचे संयोजक तडवळा (ढोकी) येथील स्थानिक होते[२५].

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लखेन:**

डॉ.बाबासाहेबांनी दलिताचे प्रबोधन व संघटन करण्यासाठी आणि त्यांच्यावर होणारे अन्याय आणि त्यांच्या न्याय हक्काची मागणी करण्यासाठी अनेक वृत्तपत्रे चालविली. मुकनायक हा पाक्षिक १९२० मध्ये सुरू केले. परंतु बाबासाहेबांना पुढील विद्याभ्यासाठी इंग्लंडला जावे लागल्याने त्यांनी हे पत्र सहका–यांकडे सोपवले ते १९२३ मध्ये हे पाक्षिक बंद पडले. या पाक्षिकांचे १९ अंक उपलब्ध असून त्यापैकी १२ अंकांचे संपादक स्वत: डॉ.बाबासाहेब आहेत. ३ एप्रिल १९२७ ते३९ पर्यंत या पाक्षिकातून डॉ.बाबासाहेबांनी जे लेखन केले त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र ठवळून निघाला होता. या पाक्षिकातून धर्मशास्त्र, तत्कालीन सामाजिक व राजकीय प्रश्नांवर लिखाण केले. या वृत्तपत्राचे ३४ अंक निघाले. त्यापैकी ३३ अंकात बाबासाहेबांचे अग्रलेख आहेत[२६]. याच वृत्तपत्रातून बाबासाहेबांनी महार व त्यांचे वतन यावर लेख लिहिले इ.स.१९३१ मध्ये बाबासाहेबांनी जनता नावाचे पाक्षिक सुरू केले. हे पाक्षिक इ.स.१९५६ पर्यंत चालू होते. बाबासाहेब हे निर्भीड व ध्येयनिष्ठ पत्रकार होते त्यांनी जाती व्यवस्था, वर्णव्यवस्था, ब्राम्हणशाही, हिंदू धर्म आणि ग्रंथावर टीका केली. त्याच्या वृत्तपत्रीय लेखनांतून अस्पृश्य समाज जागत होऊन संघटित झाले[२७].

**डॉ.बाबासाहेबांचे शैक्षणिक चळवळ :**

शिका, संघटित व्हा व लढा द्या" हा संदेश डॉ.बाबासाहेबांनी दिला होता. ते स्वत: उच्च विद्याविभूषित होते. म्हणून २० जुलै १९२४ रोजी बहिस्कृत हितकारिणी सभा स्थापन झाली. देशातील दलितांना स्वावलंबन, स्वाभिमान व आत्मोद्वार यांची शिकवत देऊन शेतात महापरिवर्तन घडवून आणणा–या युगाचा प्रारंभच होय. बहिस्कृत हितकारिणी सभेने सोलापूर येथे १९२५ मध्ये पहिले वसतिगृह सुरू केले. पनवेल व जळगाव येथे ही सभेने वसतिगृहे सुरू केली. या सभेने वाचनालय व प्रौढ स्त्री पुरूषांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. विद्यार्थ्यांत शिक्षणाची गोडी निर्माण होण्यासाठी सभेने सरस्वती विलास हे हस्तलिखित मासिक सुरू केले. डॉ.बाबासाहेबांना वाटत होते

की, अस्पृश्य समाजासाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे अशी भूमिका होती. शिक्षण हेच सर्व समस्याचे उत्तर आहे. इ.स. १९२८ मध्ये सायमन कमिशनला बाबासाहेबांनी निवेदन देऊन सरकारने अस्पृश्यांसाठी शिक्षण प्रसार करावा,त्यांच्यासाठी शाळा व वसतिगृह सुरू करावीत व शिक्षण व नोकरी याबाबत काही संरक्षक तरतुद करावी. डॉ बाबासाहेबांनी विद्यार्थी, शिक्षक प्राध्यापक, शिक्षणतज्ञ व शासनास साध्या. सोप्या भाषेत पण स्पष्टपणे देशहित समोर ठेवून शिक्षणविषयक विचार मांडले आहे.

निष्कर्ष :

२० व्या शतकातील भारतातील सामाजिक , धार्मिक, व शैक्षणिक सुधारणा चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अत्यंत महत्वांचे आहे. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. प्राध्यापक, बॅरिस्टर, समाजसुधारक, राजकीय नेते, धर्मचिंतक व धर्मसुधारक, विद्वान संसदपटू, मंत्री, अस्पृश्यांचे उध्दारकर्ते इ.नात्याने डॉ.बाबासाहेबांचे कार्य भारतीयांपुढे आदर्श आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारतात आमचे स्थान काय असेल, भवितव्य काय असेल, आमचा छळ थांबेल काय, सवलती मिळतील काय, शोषण संपेल काय, असे अनेक प्रश्न उभे केले. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांनी स्वतंत्रपणे सोडविण्याचा प्रयत्न केला. १९२३ मध्ये सी.के.बोलेंनी दलितांसाठी शाळा, सार्वजनिक जागा, कार्यालये, दवाखाने, विहिरी व तलाव येथे प्रवेश द्यावा अशी कायदेमंडळात मागणी केली. डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेत कुलाबा डिस्ट्रिक्ट डिप्रेस्ड क्लास, ची सभा झाली, २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांना मोकळे केले. अस्पृश्यांना समाजात स्थान देत नाही म्हणून "मनुस्मृती" चे दहन करण्यात आले. हिंदू धर्मस्थळी जाण्याचा मूलभूत मानवी हक्क आहे म्हणून अंबाबाई मंदिर, पर्वतीमंदिर, काळाराम मंदिर हे अस्पृश्यांना खुले करण्यात आले.१९३० च्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब हजर होते. ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा प्रसिध्द केला. महात्मा गांधीना तो मान्य नव्हता.त्यांनी उपोषण केले शेवटी पुणे करार होऊन स्वतंत्र अस्पृश्य मतदार संघ रद्द झाले. कायदेमंडळात राखीव जागांची तरतुद झाली.डॉ.बाबासाहेबांनी भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता पाळण्यावर कलम १७ प्रमाणे बंदी घातली. ३ मार्च १९२७ रोजी डॉ.बाबासाहेबांनी समता सैनिक दल स्थापन केले. ३ मार्च १९३० ते १५ एप्रिल १९३० पर्यंत काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह चालू होता. १२ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१ या काळात लंडन येथे पहिले गोलमेज परिषदेला बाबासाहेब अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून, तर ७ सप्टेंबर १९३१ ते १ डिसेंबर १९३१ या काळात दुसरी गोलमेज व १७ नोव्हेंबर १९३२ ते २४ डिसेंबर १९३२ या काळात तिसरी गोलमेज परिषद लंडन येथे संपन्न झाली. या दोन्ही परिषदांना डॉ.बाबासाहेब अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. मो.क.गांधी यांनी पुणे करारात अस्पृश्यांच्या उध्दारासाठी प्रयत्न करण्याचे मान्य केले होते. त्यानुसार त्यांनी इ.स.१९३२ मध्ये अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण संघ स्थापन केला. इ.स.१९३३ मध्ये यांच संघास त्यांनी हरिजन सेवक संघ असे नाव दिले.इ.स.१९३३ मध्ये हिंदी भाषेतून हरिजन हे वृत्तपत्र पुणे येथून सुरू केले. बाबासाहेबांनी १९२७ मध्ये बहिस्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत महारांच्या वंशपरंपरागत हुद्यासंबंधीच्या कायद्यात दुरूस्त्या सुचविणारे चळवळ सुरू केली. आणि यशवंतराव चव्हाण यांनी १९५८ मध्ये एक कायदा करून महाराष्ट्रातील महारांच्या महारकीच्या वतनाचा शेवट केला. औरंगाबाद येथील बैठी सभा १९३३, येवला येथीलसभा– १९३५, मुंबई इलाखा महार परिषद –१९३६, मक्रणपूर परिषद –१९३८, तडवळे ढोकी परिषद –१९४१, दिक्षण महाराष्ट्र बहिस्कृत वर्गाची परिषद माणगाव –१९२०, अखिल भारतीय बहिस्कृत समाज परिषद – १९२०, मुंबई इलाखा अस्पृश्यता निवारण परिषद – पुणे–१९२३, अखिल भारतीय अस्पृश्यता परिषद–दिल्ली

— १९२२, हिंदू संहिता विधेयक —१९५१, नागपूर येथे अखिल भारतीय बहिस्कृत समाज परिषद—१९२०, ४ सप्टेंबर १९२७ रोजी समाज समता संघ, आणि जून १९२६ मध्ये दलित वर्ग संस्था स्थापन केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मुकनायक (पाक्षिक), ३ एप्रिल १९२७ रोजी बहिस्कृत भारत, २९ जून १९२८ रोजी जनता पाक्षिकांचे रुपांतर साप्ताहिकमध्ये केले. देवराम नाईक हे जनता चे संपादक होते. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनता साप्ताहिकाचे नामकरण प्रबुध्द भारत असे केले. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हे बहिस्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य होते. या सभेने विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण होण्यासाठी सरस्वती विलास हे हस्तलिखित मासिक सुरू केले. वाचनालय आणि प्रौढ—पुरूषांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या १९२८ मध्ये सायमन कमिशन भारतात आले त्यापुढे विविध तरतुदी मांडल्या.जुलै १९४२ मध्ये डॉ.बाबासाहेब हे भारतातील ब्रिटिश सरकारच्या मंत्रिमंडळात मजुर मंत्री झाले.८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात येऊन मुंबई येथील वडाळा येथे २०जून १९४६ रोजी या संस्थेने "सिध्दार्थ कला महाविद्यालय" सुरू केले १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे पी.इ.एस महाविद्यालय स्थापन केले. ऑक्टोबर १९५५ मध्ये या महाविद्यालयाचे नाव बदलून मिलिंद महाविद्यालय असे ठेवण्यात आले. २३ ऑगस्ट १९५८ रोजी औरंगाबाद येथे स्वतंत्र मराठवाडा विद्यापीठ संपन्न करण्यात आले. तर १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा झाला.डॉ.बाबासाहेब यांच्या पत्नी रमाबाई हया मुंबई येथे २७ मे १९३५ रोजी मृत्यु पावल्या १५ एप्रिल १९४८ रोजी त्यांनी डॉ. शारदा कबीर यांच्याबरोबर नोंदणी पध्दतीने विवाह केला.डॉशारदा कबीर हयाच डॉ.सविताबाई आंबेडकर त्यांनाच माईसाहेब म्हटले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्नी डॉ.सविताबाई सह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौध्द धर्माची दीक्षा घेतली त्यांना दीक्षा देणा—या भिक्खुगणात पूज्य चंद्रमणी संघनायक, सद्दा तिस्स महाथेरो, संघरत्न महाथेरो, पज्जातिस्स महाथेरो, भिक्खु प्रज्ञानंद, भिक्खु परमशांती व भिक्खु सुमेधू यांचा समावेश होता. ६डिसेंबर१९५६ रोजी डॉ. भीमराव आंबेडकर यांचा मृत्यु दिल्ली येथे झाला. त्याचा अंत्यविधी मुंबई येथे चौपाटीवर ७ डिसेंबर १९५६ रोजी झाला.डॉ.सविताबाई आंबेडकर हया डॉ.बाबासाहेब यांच्या दुस—या पत्नी ते सविताबाईस शरू या नावाने उल्लेखीत असत. डॉ.सविताबाई आंबेडकर यांना न्युमोनिया झाल्यामुळे जे.जे.हॉस्पिटल मुंबई येथे २८ एप्रिल २००३ रोजी ॲडमिट केले. २२मे २००३ रोजी त्या बेशुध्द झाल्या आणि २९ मे २००३ रोजी पहाटे साडे पाच वाजता मरण पावल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर बदल पंडित नेहरू म्हणतात, बंडाचे प्रतीक दलिताचे कैवारी, असे म्हटले होते. रॅग्लर आर पी.परांजपे यांनी "दलित वर्गाच्या हक्काचा कैवारी" असे आंबेडकरांबाबत म्हटले होते. व्या.एम.सी.छगला यांनी घटनात्मक कायदा व राज्यशास्त्र यावरील अधिकारी व्यक्ती असा उल्लेख आंबेडकराबाबत केला होता. आंबेडकराच्या मृत्युनंतर ७ डिसेंबर १९५६ रोजी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने आंबेडकरांचा उल्लेख "अष्टपैलू विद्वान" या शब्दात केलाहोता. आंबेडकर विचाराचे अभ्यासक डॉ.बा.ना.कुबेर यांनी आंबेडकर विचारमंथन या ग्रंथात आंबेडकरांचा उल्लेख " दुर्लक्षित मानवतेचा प्रवक्ता" या शब्दात केला आहे.स्वत:आंबेडकरांनीम्हटले होते पददलित जनतेच्या उध्दारासाठी त्यांची सेवा करित असतांना मरण पत्करणे ही माझी गंभीर प्रतिज्ञा आहे. कारण त्या दलित जनतेतच मी जन्मास आलो. वाढलो आणि आजही त्याच जनतेत मी राहत आहे."मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, सामाजिक समता, आर्थिक न्याय इ.साठी त्यांनी आपले आयुष्य खर्च केले.

संदर्भसूची

१)डॉ.अनिल कठारे, डॉ.वाघमारे, डॉ.गौतम पाटील, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृष्ठ ११५.

२)डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुर अॅण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, जून २००३, पृष्ठ ८२४.

३)पुर्वोक्त, पृष्ठ .११६.

४)डॉ.अनिल सिंगारे, इतिहासकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०००, पृष्ठ ३५.

५)कित्ता, पृष्ठ —३६.

६)डॉ.रमेश वरखेडे (संपादक), सामाजिक चळवळी: अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार, य.चव्हाण, मुक्त दृवि.नाशिक, एप्रिल २००२, पृष्ठ १७.

७)कित्ती.१८.

८)डॉ.अरविंद सोनटक्के, डॉ.बिरादार (संपादक), साधना पब्लिकेशन्स, परभणी २०१२, पृष्ठ २८६.

९)प्रा.अशोक भवरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड २००६,पृष्ठ ९०.

१०)श्री कृष्णा मेणसे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, २००९, पृष्ठ ११.

११)व्ही.एस.क्षीरसागर (संपादक), महाराष्ट्रातील समाजसुधारक, के.सागर, प्रकाशन, पुणे, २०२०, पृष्ठ , ३१५.

१२)धनंजय कीर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११, पृष्ठ ११५.

१३)व्ही.एस.क्षीरसागर, पुर्वोक्त, ३१५.

१४)डॉ.अनिल कठारे, भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, ५ जून २०१५, पृष्ठ २९०.

१५)कित्ता, पृष्ठ २९१.

१६)डॉ.एस.जी.जाधव, भारताचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय, नांदेड, ४ जून २००५, पृष्ठ , ४६८.

१७)डॉ.अनिल कठारे, पुर्वोक्त, पृष्ठ २९२.

१८)डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पुणे करार, नाग.नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २८ सप्टेंबर २००९, पृष्ठ ५५.

१९)कित्ता , पृष्ठ ६३.

२०)व्ही.एस.क्षीरसागर, महाराष्ट्रातील समाजसुधारक साहित्यिक भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०१५ पृष्ठ ३३८.

२१)डॉ.अनिल कठारे, पुर्वोक्त, पृष्ठ २९४.

२२)डॉ.अनिल कठारे, महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी २०१४, पृष्ठ ३०९.

२३)कित्ती. पृष्ठ ३१०.

२४)डॉ.अनिल कठारे, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड १५ ऑगस्ट २०१७, पृष्ठ ६९२

२५)कित्ता —पृष्ठ ६९.

२६)डॉ.बाबासाहेब गाठाळ, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जून १९९९ पृष्ठ २६८.

२७)वसंत मून, प्रा.हरी नरके (संपादक), डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिस्कृत भारत आणि भूकनायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृष्ठ,५,६.

२८)प्राचार्य गवळी, प्रा.हिवराळे, डॉ.गवळी, प्रा.गव्हाने (संपादक), डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरग्रंथ, सौ.नंदिनी तू.गवळी, कोल्हापूर, १४ एप्रिल १९९१, पृष्ठ ३९८.

२९)श्रीमती छाया गिरगिडे, शब्दगध सुबोध साहित्य मंडळ, भोकर ११ जून २००४.

३०)रामचंद्र पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, जानेवारी २०२०.